मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 8 फेब्रुवारी 2025 | पान- 1

# पवना धरणातील पाणीसाठा 64 टक्क्यांवर!

## पिंपरी-चिंचवड शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा



**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील ८ ते १० दिवसांपासून उन्हाचा चटका वाढला असून, मावळ तालुक्यातील पवना धरणातील पाणीसाठा कमी होऊ लागला आहे. धरणातील पाणीसाठा ६३.९२ टक्क्यांवर आला आहे.

दुसरीकडे, पिंपरी-चिंचवड शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत असल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. सद्यःस्थितीत शहराला मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच भविष्याचा विचार करून महापालिकेच्या वतीने भामा आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाला वेग आला असून डिसेंबर२०२५ अखेर या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याचा मानस महापालिका प्रशासनाचा आहे.

पवना धरणात ६३.९४ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षी आजअखेर धरणात ६२.९१ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे यंदा गतवर्षापेक्षा १.३ इतका अधिक पाणीसाठा धरणात शिल्लक असून तो १५ जुलैअखेर पुरेल. असे असले तरी शहरवासीयांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया यांनी केले आहे.

**5 फेब्रुवारी अखेरपर्यंत पवना धरणातील पाणीसाठा**

| वर्ष | साठा (टक्के) |
|---|---|
| » २०२१ | ७१.२१, |
| » २०२२ | ६३.६७, |
| » २०२३ | ६३.१६, |
| » २०२४ | ६२.९१, |
| » २०२५ | ६३.९२. |

# अनधिकृत आरओ प्लांट्स बंद करण्याचे महापालिकेचे आदेश!

## महापालिका प्रशासनाचा निर्णय : अनाधिकृत आरओ प्लांट अनिश्चित काळासाठी राहणार बंद




**पिंपरी | प्रतिनिधी**

गुईलेन बेरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली असून दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्स चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. शिवाय पाण्याची गुणवत्ता आणि बॉटलिंग प्रक्रियेचा सखोल आढावा व मूल्यांकन केल्यानंतरच त्यांना पुन्हा प्लांट चालू करण्याची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

गुईलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरो वॉटर ऑपरेटर्स दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करुन पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते. असे दूषित पाणी प्रामुख्याने बोअरवेल्स व उघड्या जलस्त्रोतांमध्ये आढळते. नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणाऱ्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आर.ओ प्लांट्सवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे.

**प्रभागनिहाय करण्यात येणार कारवाई**

» पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर आणि सुरक्षा रक्षक यांच्या समन्वयाने तसेच आरोग्य वैद्यकीय विभागाकडून परवान्याबाबत तपासणी करूनच या प्लांट्सच्या बंदीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. शिवाय आर.ओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

> “ गुईलेन बेरे सिंड्रोमच्या पार्श्वभूमीवर आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या आरओ प्लांट्सवर कठोर कारवाई केली जात आहे.
>
> - प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग.

# राज्यात 'जीबीएस' बळींची संख्या सहावर!

## पुण्यातील खासगी रुग्णालयात मृत्यूची नोंद : राज्यातील रुग्णसंख्या 173 वर


**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. पुण्यातील खासगी रुग्णालयात ६२ वर्षीय रुग्णाचा मृत्यूची नोंद झाली आहे. यामुळे राज्यात आतापर्यंत मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या सहा झाली आहे. दरम्यान, राज्यातील जीबीएसची रुग्णसंख्या १७३ वर पोहोचली आहे.



पुण्यातील काशीबाई नवले रुग्णालयात ६३ वर्षीय पुरुषाचा जीबीएसने बुधवारी सायंकाळी मृत्यू झाला. ते कर्वेनगरमधील रहिवासी आहेत. त्यांना २८ जानेवारीला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना ताप, जुलाब आणि अशक्तपणाचा त्रास होता. त्यांना आयव्हीआयजी इंजेक्शन देण्यात येत होते. बुधवारी अस्वस्थ वाटू लागले आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आतापर्यंत जीबीएसमुळे सहा जणांचा मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या पहिल्या रुग्णाचा मृत्यू सोलापूरमध्ये झाला. हा रुग्ण पुण्यातून सोलापूरला गेला होता. त्यानंतर पुण्यात ४ आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

राज्यात जीबीएसचे आतापर्यंत १७३ रुग्ण आढळून आले असून, त्यातील १४० रुग्णांचे जीबीएस निदान झाले आहे. पुण्यातील जीबीएस रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, पुणे महापालिका ३४, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावे ८७, पिंपरी-चिंचवड महापालिका २२, पुणे ग्रामीण २२ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात इतर जिल्ह्यांत आतापर्यंत ८ रुग्ण आढळून आले आहेत. राज्यात आढळलेल्या एकूण रुग्णांपैकी ७२ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याचबरोबर २१ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यभरात ७२ रुग्णांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.



**वयनिहाय जीबीएस रुग्णसंख्या**

| वयोगट | रुग्ण |
|---|---|
| ० ते ९ | २३ |
| १० ते १९ | २३ |
| २० ते २९ | ३८ |
| ३० ते ३९ | २१ |
| ४० ते ४९ | २२ |
| ५० ते ५९ | २५ |
| ६० ते ६९ | १५ |
| ७० ते ७९ | २ |
| ८० ते ८९ | ४ |
| **एकूण** | **१७३** |

# शिरुरमध्ये मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कारवाई

## मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलत कर वसुलीची मोहीम तीव्र

**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर नगरपरिषद घोडनदीच्या करसंकलन विभागाने मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलत कर वसुलीची मोहीम तीव्र केली आहे. या अंतर्गत, थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीच्या कारवाईला सुरुवात झाली असून शहरातील भाजी बाजारमधील गाळा क्र. १६ थकीत मालमत्ता करापोटी सील करण्यात आला असल्याचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी सांगितले.



यासंदर्भातील आधिक माहिती देताना कर संकलन विभागाचे कर निरीक्षक अक्षय बनगिनवार, सहाय्यक कर निरीक्षक दिपक कोल्हे चंद्रकांत पठारे यांनी सांगितले की शिरुर शहरात एकुण मालमत्ता १४१२८ आहे. त्यात शासकीय कार्यालय ८४ आहेत. यंदाचा वर्षाकरीता मालमत्ता करवसूलीसाठी एकूण मागणी १०.१६ कोटी रुपयांची आहे. १ जानेवारी २०२५ अखेरपर्यंत एकूण वसुली ३.३२ कोटी रुपयांची झाली आहे. शासकीय कार्यालयाची थकबाकी ३० लाख रुपयेची आहे.

नगर परिषद चा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर दरवर्षी ०१ एप्रिल रोजी देय होतो तसेच पहिल्या सहामाही पूर्वी मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणे अनिवार्य आहे अन्यथा महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५० अ (१) अन्वये थकीत रकमेवर दरमहा २ % शास्ती आकारण्यात येते. सर्व मिळकत धारकांना आत्ता पर्यन्त भ्रमणध्वनीवर ४ वेळेस कर भरणा करणेबाबत संदेश पाठवण्यात आले आहे. डिसेंबर २०२४ पासून मालमत्ता कराचा भरणा करणेबाबत शहरात नगर परिषदच्या १० घंटा गाडी द्वारे दवंडी देखील देण्यात येत आहे.

शिरूर नगरपरिषद घोडनदीच्या करसंकलन विभागाने मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असल्याने, कर वसुलीची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. या अंतर्गत, थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई ला सुरुवात झाली असून भाजी बाजार मधील गाळा क्र. १६ थकीत मालमत्ता करापोटी सील करण्यात आला आहे. थकीत मालमत्ता धारकांच्या मालमत्तेची जप्तीची कार्यवाही या पुढे ही अशीच सुरू ठेवली जाणार असल्यामुळे कराचा भरणा करून जप्तीची अप्रिय कार्यवाही टाळण्याचे आवाहन शिरूर नगर परिषद मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी केले आहे.

### जवळपास 500 थकबाकीदारांना नोटीस

» जुलै २०२४ मध्ये कर मागणीचे देयके वितरित करण्यात आले असून १५ दिवसांत कर भरल्यास १% सूट त्यावेळी होती. शहरातील १४१२८ मिळकतींसाठी ६ विशेष पथके तयार करण्यात आली असून जवळपास ५०० थकबाकीदारांना नोटीस दिल्या आहेत. पाणी पुरवठा विभागाद्वारे नळ जोडणी तोडण्याची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून घरबसल्या भरणा करण्यासाठी शिरुर नगरपालिकेच्या वेबसाइटवर भेट देऊन भरणा करता येणार असून कर मागणी देयकावर क्यू आर कोड उपलब्ध करून देण्यात आला असून गुगल पे, फोन पे व युपीआयद्वारे कर भरणा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

# स्मार्ट सिटीचे थकविलेले वीजबिल पालिका भरणार

## ठेकेदारावर कोणतीही कारवाई नाही, वीजबिल न भरल्याने कॅमेऱ्याचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने तोडण्यास सुरुवात केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने निगडी येथे सिटी कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटर सुरू केले आहे. शहरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे या सेंटरला जोडले आहेत. सेंटर व कॅमेऱ्यासाठी स्वतंत्रपणे वीजजोड घेण्यात आले आहेत. वीजबिल न भरल्याने कॅमेऱ्यांचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने तोडण्यास सुरुवात केली आहे.




थकबाकी भरल्याशिवाय महापालिकेस नवीन वीज मीटर दिला जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा महावितरणने घेतला आहे. ते थकीत बिल महापालिका स्वत: भरणार आहे. असे असतानाही मुजोर दोषी ठेकेदारांवर कोणतीही कारवाई झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच, कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी स्मार्ट सिटी कंपनीने शहरभरात 5 हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे उभे केले आहेत. कॅमेऱ्यासाठी वीजजोड घेण्यात आले आहेत. त्याला स्वतंत्रपणे महावितरणचे मीटर लावण्यात आले आहेत. ती वीजजोडणी स्मार्ट सिटी कंपनीचे ठेकेदार क्रिस्टल तसेच, स्मार्ट सिटीने घेतले होते. या वीजपुरवठ्याचे बिल संबंधित ठेकेदार क्रिस्टलने भरणे बंधनकारक आहे.

मात्र, क्रिस्टल किंवा स्मार्ट सिटी कंपनीने बिल न भरल्याने महावितरणने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची वीजजोड तोडण्याची कारवाई सुरू केली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या सुरक्षितता आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, थकबाकी भरल्याशिवाय महापालिकेस नवीन वीज मीटर देण्यास नकार दिला जात आहे. त्यामुळे महापालिकेने स्वत: थकीत वीजबिल भरावे, असा प्रस्ताव अणुविद्युत व दुरसंचार विभागाने ठेवला होता.

त्या प्रस्तावाला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे. थकीत बिल भरून ते ठेकेदार क्रिस्टल किंवा स्मार्ट सिटी कंपनीच्या बिलातून वसूल करण्यात येणार आहे. वीजबिल भरणे बंधनकारक असताना संबंधित ठेकेदारांनी ते भरले नाही. महावितरणने वीजपुरवठा तोडला आहे. त्यामुळे महापालिकेची नाहक बदनामी झाली आहे. असे असताना मुजोर ठेकेदारांवर कोणताही कारवाई न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सेंटरचे काम करणारे ठेकेदार टेक महिंद्रा कंपनीने बिल भरले नाही. अखेर, तातडीची बाब म्हणून अ क्षेत्रीय कार्यालयाने 92 लाख 45 हजार 620 रुपयांची वीजबिलाची थकबाकी भरली. त्यामुळे सेंटरचा वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला आहे. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी 24 डिसेंबर 2024 च्या स्थायी समिती सभेत कार्योत्तर मान्यता दिली. निगडी येथे सिटी कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटर सुरू केले आहे. शहरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे या सेंटरला जोडले आहेत. सेंटर व कॅमेऱ्यासाठी स्वतंत्रपणे वीजजोड घेण्यात आले आहेत. वीजबिल न भरल्याने कॅमेऱ्यांचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने तोडण्यास सुरुवात केली आहे.

### कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटरची वीज तोडली

**» निगडी येथील टिळक चौकातील अस्तिव मॉलच्या इमारतीत स्मार्ट सिटीअंतर्गत सिटी कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटर सुरू आहे. मोठ्या प्रमाणात खर्च करूनही हा स्मार्ट सिटीतील सर्वाधिक रेंगाळलेला प्रकल्प आहे. अद्याप हे सेंटर 100 टक्के क्षमतेने सुरू झालेले नाही. स्मार्ट सिटीच्या भोंगळ कारभारातून या सेंटरचे सप्टेंबर 2024 महिन्याचे विजेचे बिल मुदतीमध्ये न भरल्याने महावितरणने वीजपुरवठा 25 नोव्हेंबर 2024 ला खंडित केला.**

# अठ्ठावीस वर्षांच्या लढ्याला यश; घंटागाडी कामगार महापालिकेत कायम होणार

## महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, मात्र ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**पिंपरी | प्रतिनिधी**

१९९७ पासून महापालिकेत कार्यरत असलेल्या घंटागाडी सफाई कामगारांना महापालिकेत कायम करण्याचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने २० ऑगस्ट २०२४ रोजी दिला होता. या आदेशा विरोधात महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. त्यामुळे २८ वर्षांच्या न्यायालयीन लढाईनंतर घंटागाडी सफाई कामगारांना महापालिकेत कायम होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याबद्दल घंटागाडी कामगारांनी जल्लोष साजरा केला.



१९९७ ते २००० पर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिकेने तीनशे ७३ कामगारांची सफाई कामासाठी नियुक्ती केली. मात्र या सर्वच कामगारांना महापालिकेने कामगार म्हणून नियुक्ती न देता ठेकेदार म्हणून नियुक्ती देण्याचा अजब प्रकार केला. हे सर्वच कामगार ठेकेदार म्हणूनच महापालिकेच्या घंटागाडीवर स्वतःच काम करत आहेत.

ठेकेदार म्हणून नियुक्त असल्याने महापालिकेत कायम करता येत नसल्याचे महापालिकेद्वारे सांगण्यात आल्यावर या कर्मचाऱ्यांनी कामगार संघटनेद्वारे पुण्याच्या औद्योगिक न्यायालयात १९९९ ला दावा दाखल केला. २००३ साली औद्योगिक न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल दिला. याविरोधात महापालिका उच्च न्यायलयात गेली.

मात्र ३० जानेवारी २०२३ ला औद्योगिक न्यायालयाने घंटागाडी कामगारांना महापालिकेत कायम करण्याचा दुबार निकाल दिला. या विरोधात पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उच्च न्यायालयात दावा दाखल केला. उच्च न्यायालयाने २० ऑगस्ट २०२४ रोजी घंटागाडी कामगारांच्या बाजूने निर्णय देत त्यांना कायम करण्याचा आदेश महापालिकेला दिला होता. मात्र या निकाला विरोधातही पुन्हा महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला होता.

या दाव्यासही पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ, पीसीएमसी युनियन आणि कामगारांनी विरोध करत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र महापालिकेचा हा दावा सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी ३ फेब्रुवारी २०२५ रोजी फेटाळल्याने घंटागाडी सफाई कामगारांना महापालिकेला २८ वर्षानंतर महापालिकेत कायम करावे लागणार आहे.

### कामगारांचे झालेले नुकसान

**» १९९७ सालापासून महापालिकेत काम करत असलेल्या घंटागाडी कामगारांना कायम नसल्याकारणाने तुटपुंज्या पगारावर काम करावे लागले. त्यांना महापालिकेच्या कायम कामगारांना मिळणाऱ्या कोणत्याही सुविधेचा लाभ मिळाला नाही. त्याचप्रमाणे या कामगारांना पगारी रजाही मिळत नसल्याने बिन पगारी रजा घ्याव्या लागल्या. या कामगारांना उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ३० जानेवारी २०२३ सालापासून कायम कायम करण्यात येणार असल्याने त्यांना कायम वेतनाच्या फक्त दोन वर्षांचा फरक मिळणार आहे.**

### कामगार निवृत्तीच्या वाटेवर

**» घंटागाडी कामगारांपैकी काही कामगारांचे वय ६० पेक्षा अधिक आहे. त्यामुळे महापालिकेने त्यांना कायम करण्याचा आदेश दिल्यास त्याच वेळेस ते कामावरून वयानुरूप निवृत्त होतील. त्याचप्रमाणे काही कामगारांची वये ही ५५ वर्षांहून अधिक असल्याने येत्या पाच वर्षात हे कामगारही निवृत्त होणार आहेत.**

# जीबीएसचे रुग्ण दूषित पाण्यामुळेच एनआयव्हीच्या अहवालात खुलासा

**किरकटवाडी, नांदेडगाव, धायरी परिसरात गुलेन बॅरे सिंड्रोमची लागण होण्यास दूषित पाणी हेच प्रमुख कारण असल्याचे राष्ट्रीय विषाणू संस्थेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.**


**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड रस्ता परिसरातील किरकटवाडी, नांदेडगाव, धायरी परिसरात गुलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) लागण होण्यास दूषित पाणी हेच प्रमुख कारण असल्याचे राष्ट्रीय विषाणू संस्थेच्या (एनआयव्ही) अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे, महापालिकेने तातडीने या भागात शुध्द पाण्याचा पुरवठा रुरू करावा अशा सूचनाही या अहवालात करण्यात आल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

या आजाराबाबत अभ्यास तसेच तपासण्या करण्यासाठी शहरातील खासगी रुग्णालये सहकार्य करत नसल्याने महापालिकेने या रुग्णालयांनी एनआयव्हीला सहकार्य करवे, अशा सूचना द्याव्यात असेही महापालिकेस सांगण्यात आले असल्याचे अतिरिक्त आयुक्त म्हणाले. महापालिका, एनआयव्हीचे अधिकारी, राज्य सरकारच्या आरोग्य विभागाचे अधिकारी यांची बुधवारी दुपारी बैठक झाली. या बैठकीत एनआयव्हीकडून हा अहवाल महापालिकेस देण्यात आला.

पुणे शहरासह जिह्यात जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. १६६ वरून आताची रुग्णसंख्या १७० इतकी झाली आहे. त्यातील ६२ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, तर २० रुग्ण व्हेंटीलेटरवर आहेत. ६१ रुग्णांवर आयुसीयुत उपचार करण्यात येत आहेत. जीबीएसच्या १७० संशयित रुग्णांपैकी १३२ रुग्णांना जीबीएस झाल्याचे निदान झाले आहे. पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील ३३ रुग्ण आहेत. तर महापालिका समाविष्ठ गावातील रुग्णसंख्या ८६ इतकी आहे. २२ रुग्ण पिंपरी- चिंचवड महापालिका क्षेत्रात आहेत. २१ रुग्ण पुणे ग्रामीण तर ८ रुग्ण हे इतर जिल्ह्यातील आहेत.

शहरातील जीबीएसची रुग्णसंख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून पाऊले उचलत बाधित ठिकाणचे सर्वेक्षणावर भर देण्यात आला. बाधित रुग्णांच्या घरातील पाण्याचे नमुने घेतले जात आहेत. अशातच आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिकेच्या टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्या सगळ्या टँकरच्या पाण्यात ई कोलाय कॉलीफॉर्मचे विषाणू आढळून आले आहेत. 15 टँकर भरण्याच्या सगळ्या पॉईंटवरून टँकरने होणारा सगळा पाणी पुरवठा दूषित असल्याचे एनआव्हीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.



### जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे विचारधीन

» या पार्श्वभूमीवर एनआयव्हीने पुणे महापालिकेला यासंबधी काही सूचना केल्या आहेत. त्यानुसार संबंधित गावांसाठी छोठा जलशुद्धीकरण प्रकल्प सुरू करण्याचा विचार महापालिकेने केला आह. धायरी, नांदेडगाव, सिंहगडरस्ता, किरकटवाडी, खडकवासला या भागातील रुग्णसंख्या अधिक आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून हा आजार आटोक्यात आणण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विविध उपयायोजना केल्या जात आहेत.

### रुग्ण संख्या वाढण्यावर होणार संशोधन

» या बैठकीत एनआयव्हीकडून आणखी संशोधन करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. शहरात या पूर्वीही जीबीएसचे रुग्ण वर्षभर आढळत आहेत. मृत्यूचे प्रमाण नगण्य आहे. मात्र, आता अचानक रुग्ण वाढले कसे? याबाबत एनआयव्हीकडून आणखी संशोधन केले जाणार आहे. त्यासाठी आणखी चाचण्या करणे गरजेचे असल्याने महापालिकेने पाण्याचे नमुने १०० मिलिलीटर ऐवजी दोन लिटर इतके घ्यावे व ते दीर्घकाळ साठवून ठेवावे, अशा सूचना एनआयव्हीने केल्या आहेत. याशिवाय नागरिकांच्या घरापर्यंत पाणी देताना त्यात क्लोरिनचे प्रमाण किमान ०.३ पीपीएम असणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आल्याचे ते म्हणाले.

### खासगी रुग्णालयांचा असहकार

» जीबीएसची लागण झालेले काही रुग्ण खासगी रुग्णालयात दाखल आहेत. एनआयव्हीतर्फे या रुग्णांची भेट घेऊन काही नमुने गोळा केले जात आहेत. मात्र, काही रुग्णालयांकडून सहकार्य केले जात नसल्याची तक्रार एनआयव्हीने केली आहे. या आजाराच्या कारणांचा तसेच भविष्यात त्याला प्रतिबंध करण्यासाठी रुग्णांची माहिती, तसेच इतर काही तपासण्या आवश्यक आहेत. त्यासाठी एनआयव्हीचे कर्मचारी रुग्णालयात गेले असता त्यांना माहिती देण्यास नकार दिला जात आहे. त्यामुळे, महापालिकेने या सर्व रुग्णालयांना एनआयव्हीला सहकार्य करण्याच्या सूचना तातडीने केल्या आहेत. महापालिकेने केलेले सर्वेक्षण एनआयव्हीच्या सूचनांप्रमाणे झालेले नाही. परिणामी, महापालिकेने पुन्हा एकदा सर्वेक्षण करावे, तसेच आणखी माहिती आणि नमुने संकलीत करावेत, अशा सूचनाही पालिकेस करण्यात आल्या असल्यचे यावेळी सांगण्यात आले.

# विवाह संस्थांचे भवितव्य धूसर; तरुण-तरुणींच्या भ्रामक अपेक्षांचे ओझे कायम

**सध्या विवाह योग्य वय असलेल्या मुलांचे लग्न न होणे ही एक जटील समस्या निर्माण झाली आहे, त्याचे परिणाम हे भविष्यातही मोठ्या प्रमाणात दिसणार आहेत.**

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या राज्यात विवाह योग्य वय असलेल्या मुलांचे लग्न न होणे ही एक जटील समस्या निर्माण झाली आहे. त्याचे परिणाम हे भविष्यातही मोठ्या प्रमाणात दिसणार आहेत. यासाठी आपली मानसिकताच कारणीभूत आहे. याचे परिणाम दूरगामी होणार आहेत. अनेक अडचणींना सर्व समाजाला सामोरे जावे लागणार आहे. त्यातून कोणाचीच सुटका होणार नाही. जे आज सुपात आहेत, ते उद्या जात्यात असणार आहेत. भौतिक सुविधांच्या मागे धावणाऱ्या तरूण- तरूणींच्या भ्रामक अपेक्षांचे ओझे कायम आहे.

पुढील काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण-तरुणी (विशेषत: तरुण) मोठ्या संख्येने दिसणार आहेत. वृध्द झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीच न झाल्याने वृद्धाश्रमामध्ये जाण्याची किंवा एकाकी आयुष्य काढण्याची वेळ येणार आहे., हे भयाण वास्तव नाकारू शकत नाही. अर्थात या परिस्थितीचा त्रास हा या पिढीबरोबर त्यांच्या पालकांना सुद्धा आयुष्याच्या वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंतांना जन्म देत आहे. मुला-मुलींचे लग्न झाल्यावर पालकांचे मोठे कर्तव्य संपते, जबाबदारी संपते. पुढील पिढीकडे सूत्रे देऊन पालक आपल्या निवृत्ती आयुष्याचे नियोजन करु शकतात.



### तारुण्यातील वर्षे वाया

» वाया गेलेली अमूल्य तारुण्याची वर्षे, केलेले कष्ट, वाढलेले वय यात काहीच साध्य न झाल्यामुळे यातून एक प्रकारची निराशा निर्माण होत असते. जास्त आधुनिकतेच्या मागे न जाता आपली संस्कृती व आधुनिकता याचा सेतू बांधून लवकर वैवाहिक आयुष्याची गाडी कशी पुढे नेता येईल याचा विचार होणे गरजेचे आहे. आज अपेक्षेचे ओझे वाढवून नाहक मुला-मुलींचे वय निघून जात आहे. याची खंत मुलांना तसेच पालकांना नाही. पालकांनी आणि मुला-मुलींनी भविष्याचा विचार करणे गरजेचे आहे.

### भौतिक चंगळवाद बोकाळला

» शिक्षणाची अपेक्षा, आर्थिक परिस्थिती, जमीन, राहण्यासाठी स्वतःचे घर, सौंदर्याच्या व्यापक अपेक्षा, मेट्रो सिटीत वास्तव्य असावे. आदी अनेक अपेक्षांमुळे विवाहाचे वय निघून जात आहे. तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. अर्थात ते आपणहून आपल्यावर लादून घेतलेल्या अपेक्षांमुळेच होत आहे. बायोडाटा बघून किंवा शैक्षणिक पात्रता बघून, त्यातील प्रतिकूल मुद्द्यांचा विचार करुन विवाहासाठी पार्श्वभूमी तयार करता येईल, याचा विवाहेच्छुक तरुण-तरुणींनी विचार गंभीरपणे करायला हवा. नको त्या गोष्टींचा आग्रह हा आपल्या वैवाहिक आयुष्याला मारक आणि बाधक ठरत आहे. त्यामुळे कल्पनांचे इमले रचूनही वास्तवात एकाकीपणे जगायची वेळ येत आहे.